पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
स्थापना- 1986
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ५२ वा | गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# चर्चेची दारे बंद; जरांगेंचा एल्गार !; १२ तारखेला निर्णय, मुंबईला येणारच !

## मराठा आरक्षणाच्या मागणीवरून सरकारवर घणाघाती टीका | उपोषण स्थगित करण्यास स्पष्ट नकार

**अंतरवाली सराटी, (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील वातावरण पुन्हा तापले असून, सरकारने चर्चेची दारे बंद करण्याची भूमिका घेतल्याने मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'सरकार ज्या पद्धतीने आमच्याशी वागेल, त्याच पद्धतीने मराठा समाजही सरकारसोबत वर्तन करेल. माझे कुणी काहीही वाकडे करू शकत नाही. उपोषण स्थगित करणार नाही. येत्या १२ सप्टेंबरला चर्चेनंतर पुढील निर्णय घेतला जाईल आणि मराठा समाज मुंबईत येऊन आंदोलन करणारच,' असा इशारा जरांगे पाटील यांनी बुधवारी दिला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या उपोषणावर तोडगा काढण्यासाठी सरकारकडून चर्चा केली जाणार नसल्याची भूमिका मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली आहे. त्यामुळे जरांगे पाटील आणखी आक्रमक झाले आहेत. सरकारचा नाकर्तेपणा सिद्ध झाला असून सरकार सपशेल हरले आहे, असा आरोप त्यांनी केला.

**'उपोषण स्थगित करून पोळ्याला जायचंय का ?'**

सरकारकडून आंदोलन स्थगित करण्याचे आवाहन करण्यात येत असल्यावर जरांगे पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. 'मला सांगितले जात आहे की आरक्षण प्रश्नावरील उपोषण स्थगित करा. उपोषण स्थगित करून पोळ्याला जायचंय की काय? अजिबात उपोषण स्थगित करणार नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सव आणि पोळा सण असल्याने आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली जात असल्यावरही त्यांनी सरकारला सुनावले. 'आम्ही मराठ्यांच्या लेकरांपुढे सणवार बघत नाही. आरक्षणाचे काय झाले, यावर सरकारने बोलावे. हैदराबाद गॅझेट लागू होणार होते, त्याचे काय झाले? रद्द केलेली प्रमाणपत्रे परत देण्याचे काय झाले?' असे सवाल त्यांनी उपस्थित केले.

**'प्रमाणपत्रे कोणी रद्द केली ?'**

मराठा समाजाला मिळालेली कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यावरूनही जरांगे यांनी सरकारला धारेवर धरले. एकनाथ शिंदे आणि संजय शिरसाट यांनी ठरवून मराठ्यांची प्रमाणपत्रे रद्द केली असल्याचा आरोप त्यांनी केला.

'जे कोणी एकनाथ शिंदे यांचे समर्थक आहेत त्यांनी सांगावे की, मराठ्यांना मिळालेली कुणबी प्रमाणपत्रे कोणी रद्द केली? उदय सामंत यांना दोन महिन्यांपासून सांगत आहे की, प्रमाणपत्रे द्या. मात्र त्यावर निर्णय घेतला जात नाही,' असा आरोप जरांगे यांनी केला.



**'मुंबईत आंदोलन करणारच'**

आंदोलनाच्या पुढील टप्प्याबाबत येत्या १२ सप्टेंबरला निर्णय जाहीर केला जाणार असल्याचे जरांगे यांनी सांगितले. मराठा समाज मुंबईत येऊन आंदोलन करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. 'मराठ्यांचे कुणी काही करू शकत नाही. येत्या १२ तारखेला चर्चेनंतर निर्णय करू. आम्ही मुंबईत येऊन आंदोलन करणार,' असे जरांगे पाटील यांनी सांगितले. दरम्यान, सरकार आणि मराठा आंदोलक यांच्यातील चर्चेचा मार्ग बंद झाल्याने आरक्षणाचा प्रश्न पुन्हा चिघळण्याची चिन्हे आहेत. आगामी काही दिवसांत सरकारची भूमिका काय राहते आणि १२ सप्टेंबरला जरांगे पाटील आंदोलनाची कोणती दिशा जाहीर करतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

सरकारमधील काही नेते वेगवेगळी भूमिका घेत असून त्यामागे षडयंत्र असल्याचा आरोपही त्यांनी केला. मराठ्यांमध्ये भांडणे लावण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा करत त्यांनी सरकारला इशारा दिला.

**शिंदे समर्थक आमदारांवरही निशाणा**

एकनाथ शिंदे यांच्या समर्थक आमदारांवरही जरांगे पाटील यांनी टीका केली. 'देवेंद्र फडणवीस आरक्षण देऊ शकत नाही, हे मान्य करा. आंदोलकांच्या अंगावरील वळांची किंमत एकनाथ शिंदे यांनाही नाही. माझा एकनाथ शिंदे यांच्यावर जीव होता; परंतु ते मराठ्यांच्या लेकरांच्या भविष्यासोबत खेळले,' असे ते म्हणाले.

'जो मराठ्यांचा नाही, त्याच्याशी मी चांगले बोलणार नाही. आपल्या नेत्यासाठी तुम्ही समाजावर टीका करताय? तुमचा नेता तुमचा बाप आहे का?' असा सवाल करत जरांगे यांनी शिंदे समर्थक आमदारांना सुनावले.

**'भाषा बदलणार नाही; आणखी तीव्र बोलेन'**

आपल्या वक्तव्यांबाबत होत असलेल्या टीकेलाही जरांगे यांनी प्रत्युत्तर दिले. 'मला भाषा बदलायला सांगताय; पण मी भाषा बदलणार नाही. उलट यापेक्षा तीव्र भाषा वापरणार,' असा इशारा त्यांनी दिला.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने आता निर्णायक भूमिका घ्यावी, अशी मागणी करत त्यांनी सर्व पक्षांच्या आमदारांना आव्हान दिले. 'सर्व पक्षांतील मंत्री आणि आमदार एकत्र झाले तरी मराठ्यांना आव्हान देऊ शकत नाहीत. महाविकास आघाडीसहित आणि महायुतीसहित तुम्ही एकत्र या. आता निर्णय होणारच,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# १३ टक्के आरक्षणाच्या चौकटीत मातंग समाजाला स्वतंत्र वाटा द्या

## प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा; रमेश कदम यांची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील अनुसूचित जातींसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणाच्या चौकटीतच मातंग समाजाला स्वतंत्र व न्याय्य वाटा देण्यात यावा, अशी मागणी माजी आमदार तथा क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाचे अध्यक्ष रमेश कदम यांनी पत्रकार परिषदेत केली. मातंग समाजाच्या प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घेऊन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाची स्थापना करण्यात आली होती. या आयोगाने विविध बाबींचा अभ्यास करून शासनाला ८२ शिफारशींचा अहवाल सादर केला आहे. या शिफारशींच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या अभ्यासगटानेही आर्थिक भार, विविध विभागांशी संबंधित बाबी आणि अंमलबजावणीचा आढावा घेऊन शासनाला अहवाल सादर केला आहे. त्यामुळे आता अहवाल आणि शिफारशींवर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष निर्णय घेण्याची गरज असल्याचे कदम यांनी सांगितले.

**'१३ टक्के आरक्षणाच्या चौकटीतच वाटा हवा'**

मातंग समाजाला अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाच्या बाहेर स्वतंत्र आरक्षण नको, तर याच आरक्षणाच्या चौकटीत स्वतंत्र वाटा देण्यात यावा, अशी भूमिका कदम यांनी स्पष्ट केली. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत दिलेल्या निर्णयामुळे अधिक मागासलेल्या घटकांना आरक्षणाचा लाभ न्याय्य पद्धतीने मिळवून देण्याच्या दिशेने मार्ग खुला झाला आहे, असे त्यांनी सांगितले.




मातंग समाजाची सामाजिक व शैक्षणिक स्थिती, सरकारी नोकऱ्यांमधील प्रतिनिधित्व, राजकीय सहभाग तसेच शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ यांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. ही मागणी कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून वंचित घटकांना न्याय्य संधी मिळावी, यासाठी असल्याचे कदम यांनी स्पष्ट केले.

**'वाद नको, संवाद हवा'**

उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी संवादासाठी पुढे यावे, असे आवाहन कदम यांनी केले. 'प्रकाश आंबेडकर हे सर्वांसाठी आदर्श आहेत. मात्र या विषयावर त्यांची भूमिका विरोधाची आहे. त्यांच्या टीकेमुळे दुःख झाले. कोण बरोबर आणि कोण चूक हे रस्त्यावरच्या घोषणांनी ठरवण्यापेक्षा संविधान आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय काय सांगतो, यावर चर्चा झाली पाहिजे,' असे कदम म्हणाले.

उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात असलेल्या दोन्ही बाजूंनी घटनातज्ज्ञांच्या उपस्थितीत खुली चर्चा करावी. महाराष्ट्रातील निष्पक्ष घटनातज्ज्ञ डॉ. उल्हास बापट यांच्यासमोर चर्चा करण्यास आपण तयार असल्याचेही त्यांनी सांगितले. 'आम्हाला वाद नको, संवाद हवा आहे. घोषणांपेक्षा ज्ञान आणि संविधानाच्या आधारे या विषयाकडे पाहिले पाहिजे,' असे कदम यांनी स्पष्ट केले.

**सामाजिक न्याय विभागाच्या खर्चाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी**

सामाजिक न्याय विभागाला गेल्या काही वर्षांत किती निधी मिळाला, तो कोणत्या योजनांवर खर्च झाला, किती लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळाला आणि किती निधी अखर्चित राहिला, याची माहिती शासनाने जाहीर करावी. यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या खर्चाची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून संपूर्ण खर्चाचे आर्थिक लेखापरीक्षण करावे, अशी मागणी कदम यांनी केली.

महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या सर्व घटकांना आरक्षण, शिक्षण, रोजगार आणि शासकीय योजनांचा लाभ न्याय्य प्रमाणात मिळतो आहे का, याची वस्तुनिष्ठ आकडेवारीही शासनाने समाजासमोर ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

**८२ शिफारशींच्या अंमलबजावणीचा हिशेब द्या**

मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनाला सादर केलेल्या ८२ शिफारशींपैकी किती शिफारशी स्वीकारण्यात आल्या, कितींची अंमलबजावणी झाली आणि त्याचा समाजाला प्रत्यक्ष किती फायदा झाला, याचा तपशील शासनाने जाहीर करावा, अशी मागणीही कदम यांनी केली.

'आमची लढाई कोणत्याही समाजाविरुद्ध नाही. कोणाचाही अधिकार काढून घेण्याची आमची मागणी नाही. मातंग समाजाला त्याचा न्याय्य घटनात्मक वाटा आणि समान संधी मिळावी, एवढीच आमची भूमिका आहे. संघर्षापेक्षा संवाद, विभाजनापेक्षा बंधुता आणि अज्ञानापेक्षा ज्ञानाला आम्ही महत्त्व देतो,' असे कदम यांनी सांगितले.

यावेळी समाधान वाघ, सुधीर खंदारे, विजय कसबे, धनाजी वाघमारे, राहुल कोळी, प्रवीण धडे, रवींद्र वाघमारे आदी उपस्थित होते.

# सोलापूरसह राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

## शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्याची स्वराज्य संग्रामची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पावसाने दडी मारल्याने सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत खरीप पिके संकटात सापडली असून, काही ठिकाणी पेरणीही होऊ शकलेली नाही. त्यामुळे शासनाने सोलापूरसह संपूर्ण राज्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी स्वराज्य संग्रामचे अध्यक्ष तानाजीराव शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केली.



पावसाअभावी सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारखी खरीप पिके करपली आहेत. याशिवाय ऊस, कापूस तसेच फळबागांनाही मोठा फटका बसला आहे. अनेक जिल्ह्यांत पावसाअभावी पेरणीच करता आलेली नसल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने सर्व पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी शिंदे यांनी केली.

**मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर द्या**

नुकसानभरपाई देताना केवळ खरीप पिकांचा विचार न करता ऊस, कापूस आणि फळबागांचाही समावेश करावा. शासनाकडून मिळणारी मदत कोणत्याही मध्यस्थामार्फत न देता थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

**पीकविमा कंपन्यांवर शासनाने दबाव आणावा**

पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांकडून नुकसानभरपाई मिळण्यासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी. विमा कंपन्यांवरील शेतकऱ्यांचा विश्वास कमी झाल्यामुळे अलीकडील काळात पीकविमा घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण घटले आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांनी विमा भरला आहे, त्यांना नुकसानीची योग्य भरपाई वेळेत मिळणे आवश्यक आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

पशुधन वाचविण्यासाठी केवळ चारा डेपो किंवा छावण्या सुरू करण्याऐवजी पशुपालक शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी. दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चाऱ्यासह त्यांच्या देखभालीचा खर्च भागविणे शेतकऱ्यांना कठीण होत असल्याने शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असे शिंदे यांनी सांगितले.

**शेती कर्जाची वसुली थांबवा**

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन बँकांनी शेतकऱ्यांकडील शेती कर्जाची वसुली तात्पुरती थांबवावी. तसेच कर्जाचे पुनर्गठन करण्याबाबत शासनाने बँकांना स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

नुकत्याच जाहीर झालेल्या कर्जमाफीमध्ये थकीत कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ मिळत आहे. मात्र अनेक शेतकऱ्यांनी उसनवारी करून किंवा अन्य मार्गाने नियमितपणे कर्जाची परतफेड केली आहे. सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ देण्याबाबत शासनाने पुनर्विचार करावा, अशी मागणी शिंदे यांनी केली.

**तातडीने ठोस उपाययोजनांची गरज**

राज्यातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना शासनाने केवळ घोषणांवर न राहता प्रत्यक्ष मदत पोहोचविण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण अर्थव्यवस्था वाचविण्यासाठी नुकसानभरपाई, पीकविमा, कर्ज पुनर्गठन आणि आर्थिक मदतीबाबत त्वरित निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे शिंदे यांनी सांगितले.


या पत्रकार परिषदेस ज्ञानेश्वर जाधव, बाबासाहेब लांडे-पाटील, रामचंद्र शिंदे, गंगाधर गायकवाड, सागर गायकवाड आदी उपस्थित होते.

# जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अंतरवली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सोलापुरात अनोखे आंदोलन करण्यात येत आहे. शासनाकडून जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याच्या निषेधार्थ सोमनाथ राऊत यांच्या नेतृत्वाखाली १० ते १५ आंदोलक पाण्याच्या टाकीवर चढले आहेत.

सोलापूर विद्यापीठाजवळील पाण्याच्या टाकीवर हे आंदोलन सुरू आहे. आंदोलकांकडून 'कोण म्हणतं देत नाही, घेतल्याशिवाय राहत नाही', 'लढेंगे, जितेंगे, हम सब जरांगे', 'सरकारचा धिक्कार असो' अशा घोषणा देण्यात येत आहेत.

दरम्यान, आंदोलक पाण्याच्या टाकीवर चढल्याने घटनास्थळी पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून, आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# परीट (धोबी) समाजसेवा मंडळाची नूतन कार्यकारिणी जाहीर

## ३० डिसेंबरला वधू-वर मेळावा व सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजातील युवक-युवतींना विवाहासाठी योग्य जोडीदार मिळावा, विवाहाचा खर्च कमी व्हावा आणि समाजातील एकोपा वाढावा, या उद्देशाने सोलापूर शहर परीट (धोबी) समाजसेवा मंडळाच्या वतीने ३० डिसेंबर २०२६ रोजी भव्य वधू-वर परिचय मेळावा व सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शहराध्यक्ष संतोष काटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर शहर परीट समाजसेवा मंडळाची नूतन कार्यकारिणी व ज्येष्ठ सल्लागार मंडळाची घोषणा यावेळी करण्यात आली. वधू-वर परिचय मेळावा व सामुदायिक विवाह सोहळ्याच्या उत्सवाध्यक्षपदी किशोर काटकर यांची सवार्नुमते निवड करण्यात आली.समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार आणि शासकीय योजनांचा लाभ समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्यावर मंडळाचा भर राहणार आहे. मार्गदर्शन व प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे काटकर यांनी सांगितले.

समाज मंदिर उभारणीचा विषयही मंडळाच्या प्राधान्यक्रमावर असून, समाजाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे काम मंडळ करणार असल्याचे स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस संघटनेचे शहराध्यक्ष संतोष शंकरराव काटकर तसेच कायम निमंत्रित सदस्य सुमित गणपत भोसले, शहर सचिव नंदकुमार बाबुराव भोसले, अशोक घोडके, किशोर काटकर, विलास महागांवकर, राजविलास राऊत, सतीश घोडके, बिभीषण वरपे, प्रभाकर भोसले, उमेश घोडके, सुशांत गायकवाड, महाकालेश्वर कदम, सचिन चौगुले, निलेश काटकर, किरण काटकर, रोहित कारंडे, गुंडू वाघमारे, आनंद अडसुळे, महेश नवले, बाबाजी माडिकर, अक्षय कारंडे व संघटनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व ज्येष्ठ सल्लागार उपस्थित होते.



**नूतन कार्यकारिणी अशी :** शहराध्यक्ष संतोष काटकर, कार्याध्यक्ष प्रभाकर भोसले, उपाध्यक्ष सुशांत गायकवाड, बालाजी काटकर, मनोज अडसुळे, महाकालेश्वर कदम, सचिव नंदकुमार भोसले, खजिनदार सचिन चौगुले, प्रसिद्धी प्रमुख निलेश काटकर, सहप्रसिद्धी प्रमुख नवनाथ दळवी, सरचिटणीस किशोर काटकर, चिटणीस किरण काटकर. सुमित भोसले हे कायम निमंत्रित सदस्य आहेत.

ज्येष्ठ सल्लागार मंडळात गणपत भोसले, अशोक घोडके, अरुण भोसले, सतीश घोडके, विलास महागांवकर, राम भोसले, राजविलास राऊत, बिभिषण वरपे, किसन कदम, उमेश घोडके, गोरख काटकर व विजय शेलार यांचा समावेश आहे.

## संपादकीय

# बापटांचा 'मराठी धक्का' की आपल्या भाषिक अधोगतीचा आरसा?

विद्यानंद बापट काय बोलत आहेत, त्यांचे म्हणणे काय आहे, यापेक्षाही ते कसे बोलतात याकडेच सर्वांचं अधिक लक्ष दिसतं. म्हणजे 'बिनबापटांच्या मराठी'ते सांगायचं तर, 'बापटांच्या कन्टेन्टपेक्षा त्यांच्या मराठी स्टाइलवर लोक फिदा झालेत'!

बापटांचा कन्टेट मुळात जबरदस्त आहेच पण त्या तऱ्हेनं व ज्या अस्सखलितपणे त्यांनी मुद्दा मांडतात आणि स्टाइल-कन्टेन्ट यांचे 'कॉम्बिनेशन' झाले, त्याचाच जणू लोकांना सुखद धक्का बसला असावा. त्यातून 'बापटांचे मराठी' हाच कौतुकाचा, थट्टेचा, कुचेष्टेचा विषय ठरला... त्यातून, या मराठीमुळे लोकांना धक्का बसलाय की लोकांनी धसका घेतलाय असाही प्रश्न काहींना पडला.

वस्तुतः बापट जे बोलतात ते काही फार 'वेगळं' मराठी नाहीच मुळी!

मग बापटांच्या मराठीचा लोकांनी जणू काही धसका घेतलाय, असं चित्र का उभं राहिलंय? किंबहुना बापट जे बोलतात त्यापेक्षाही ते जसं बोलतात त्यावर, म्हणजे त्यांच्या मराठीवर हजारो रील्स का तयार होताहेत? तर याचं उत्तर गेल्या कित्येक वर्षांत मराठीवर आपल्याच लोकांनी व मायबाप सरकारने केलेली 'अत्यल्प बौद्धिक तरतूद'!

मराठी वाचन किंवा मराठी लेखन हे आपल्यातून गेल्या तीसएक वर्षांत जवळपास हद्दपार झालेलं आहे. याला कारण लोकांचा इंग्रजी शाळांचा सोस. त्यांच्या बेगडी शिक्षणाला आपणच दिलेलं चंदेरी स्वरूप आणि त्या शाळांतून इंग्रजीचे जेमतेम ज्ञान असलेल्या आणि तदनुषंगानं अल्पवेतनानुज्ञित शिक्षकांचं फोफावलेलं पीक! मग इंग्रजी शाळांत भाषा म्हणून इंग्रजीची वाट तर लागलीच पण मराठी भाषा तर भिकेला लागली, नव्हे आम्हीच ती लावली!

मराठी बोलायची लाज वाटणारे आम्ही, बापटांची मराठी ऐकून एकदमच शहारून गेलो..भेदरून गेलो. 'मराठी अशी असते तर?' असं म्हणायची नामुष्की आमच्यावर आली व त्यामुळे आम्ही बापटांच्या बोलण्यातला कन्टेन्ट म्हणजे आशय दुय्यम ठरवला व त्यांच्या मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषेवरच्या प्रभुत्वाला- 'स्टाइल'नंच आम्ही भारावून गेलो. त्यांनी मराठीचे 'क्लास' घ्यावेत असं त्यांना सुचवण्यापर्यंत लोकांची उथळ मानसिकता सामोरी आली. त्यांच्या मुलाखती घेतल्या जाऊ लागल्या ज्यात त्यांना आपले मराठी इतकं 'भारी' कसं... किंवा आपल्याला 'आवडत' असलेला श्लोक कुठला... असले प्रश्न विचारले जाऊ लागले. त्यात 'घटं भिन्द्यात पटं छिन्द्यात कुर्यात गर्दभरोहणम । येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत ।।' या श्लोकाचा पुनरुच्चार त्यांच्या तोंडून करवून घेण्याचा, किंवा याच श्लोकाचा अर्थ बापटांकडून वदवून घेण्याचा उच्छृंखल सपाटाच माध्यमांनी लावला! यात त्या माध्यमांची भाषेची 'पोहोच' किती मर्यादित आहे हेच तर दिसलं. पण विद्यानंद बापट यांनी न चिडता-वैतागाची रेषाही दिसू न देता सांगितलं की, "चीप पब्लिसिटी ज्यांना हवी असते, म्हणजे सवंग प्रसिद्धी मी म्हणतो ते. त्याचा उपहास म्हणजे सटायर करणारे संस्कृतमधील ते सुभाषित आहे. घटम म्हणजे मातीची मडकी, ती फोडावी आणि पटं छिन्द्यात, पट म्हणजे कापड आणि छिन्द्यात म्हणजे फाडावी. कुर्यात गर्दभरोहणम, गर्दभ म्हणजे गाढव. ते सामान वाहून नेण्यासाठी वापरलं जातं. त्याच्यावर घोड्यासारखं माणसांनी बसावं- आरोहण करावं. म्हणजे मडके फोडावे, वस्त्र फाडावे आणि गाढवावर बसावे आणि कोणत्याही प्रकारे प्रसिद्ध व्हावे असा याचा अर्थ आहे.." - लोक भाळलेच!

अर्थात या श्लोकाच्या अथार्नुसार फक्त प्रसिद्धी, प्रसिद्धी आणि प्रसिद्धी याच एका उद्देशाला केंद्रस्थानी ठेवून वाटचाल करणाऱ्या किंवा मनोरंजन हाच एकमेव कन्टेट राबवणाऱ्या विविध 'समाजमाध्यमकर्मी'ना आपल्या रील्सरूपी 'गर्दभारोहणा'ची जाणीव आतातरी व्हावी की नाही? हे शेकडो वर्षांपूवीर्च सुभाषित बापटांनी आता लोकप्रिय केलं; तर मग आमच्या शालेय अभ्यासक्रामातले संस्कृत- किंवा मराठीसुद्धा- इथल्या अनेकांनी फक्त 'पासापुरतंच' अभ्यासलं, मार्कापुरतंच वापरलं, हेच यातून सिद्ध होत नाही का..?

मुळात आपलीच मातृभाषा मराठी आपण इतकी वर्षं 'खुंटीला टांगून' ठेवण्याचा हा परिपाक आहे हेच यातून सिद्ध होतं, असंच म्हणावं लागेल!

शाळेचा उपयोग फक्त 'सूचीबद्ध ज्ञान' मिळवण्यासाठीच केला जातो तेव्हा हे असले 'बापट धक्के' आपल्याला बसतात हेच धक्कादायक वास्तव.

लहानपणापासून चिमणीला 'स्पॅरो' म्हणायचा अट्टाहास करणाऱ्या 'नवाधुनिक मम्मी' आपापालं 'पॅरेंटहूड' अंगी बाणवून आपल्या पोरांना बाटलीला आवर्जून 'बॉटल' म्हणायला लावून त्याच 'बॉटल' मध्ये मराठीचं 'भूत' बंद करून टाकतात, यासारखे घरोघरी घडणारे प्रयोग आपल्या अख्ख्या शिक्षणव्यवस्थेचं विदारक वास्तव अधोरेखित करतात.

'ज्याचे मातृभाषेवर प्रभुत्व त्याचे जगातल्या कोणत्याही भाषेवर प्रभुत्व,' हे आचार्य अत्रे यांनीही सांगितलं होतं मातृभाषा शिक्षणाची गरज मोठमोठे भाषातज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ यांनीही प्रतिपादन केली आहे. अत्रे हे भाषाप्रभू होतेच आणि शिक्षणतज्ज्ञही होतेङ्ग त्यांनी 'बालभारती'च्या काळाआधी 'नवयुग वाचनमाला' तयार केली आणि 'हा सुवेझ कालवा, थक्क करिल मानवा' सारख्या साध्यासोप्या मराठी कवितांतून ज्ञानही वाढवलं. पण हेच अत्रे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात राजकारणातही महत्त्वाचे नेते ठरले, ते केवळ भाषेमुळे नव्हे- त्यांची भूमिका लोकांना पटत होती म्हणून!

आज नेमकं याउलट घडतं आहे. लोकांना मराठी येत नाही म्हणून, बापटांच्या वैचारिक भूमिकेपेक्षा त्यांच्या भाषेकडेच लक्ष वेधलं जातं आहे. बापटांचं म्हणणं आपण भाषेपुरतंच मर्यादित केलं हा आपला करंटेपणा!

# शेतकऱ्यांचा उत्साहाचा आणि आनंदाचा सण बैलपोळा

भारतीय संस्कृती ही पुरातन संस्कृती आहे.त्याचप्रमाणे भारत कृषीप्रधान देश आहे.त्यामुळे संपूर्ण शेतीतील कामे बैलांच्याच मदतीने केली जात होती आणि आताही केली जातात. त्यामुळे भारतात आपल्याला वेगवेगळे सण उत्सव पहायला मिळतात. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानल्या जातो. कारण पुर्वी संपूर्ण कामे बैलांच्याच मदतीने व्हायची व बैल बीना संपूर्ण कामे अधुरी रहायची.श्रावण महिन्यातील अमावस्येला हा सण उत्सव शेतकरी मोठ्या उत्साहाने बैलांची पूजाअर्चना करून साजरा करतात.या सणाला पिठोरी अमावस्या,मोठा पोळा किंवा बैलपोळा असेही म्हणतात.या दिवशी संपूर्ण शेतकरी बांधवांचा परिवार बैलांच्या सेवेत मग्न असतात.बैलपोळ्याला शेतकरी दिवाळीसारखा सण साजरा करतात.त्या दिवशी बैलांपासुन कोणतेही काम करून घेतले जात नाही व बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येतो.या सणाची सुरूवात बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर सुरूवात होते.बैलपोळ्याच्या एकदिवस अगोदर मातीचे बैल बनवून त्याची पुजाअर्चना केली जाते व त्यांना नैवेद्य केला जातो.त्याच दिवशी म्हणजे बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर बैलांची पुजा केली जाते त्याला खांदशेकणी असे म्हणतात.कारण वर्षभर बैलांना शेतकरी राबवितो अशा परिस्थितीत त्यांच्या खांद्याला अनेक जखमा होतात.म्हणुनच म्हणतात "कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावर" अशी जी म्हण आहे ती सत्य आहे. देशातील करोडो लोकांना अन्न पुरवठा व्हावा या उद्देशाने शेतकऱ्यांना बैलांपासुन काम करून घ्यावे लागते. बैलाला वर्षभर यातना भोगाव्या लागतात.तेव्हाच देशातील करोडो लोकांना अन्नधान्य मिळते.कारण वर्षभर नांगर,वखर,बंडीचे जु त्यांच्या खांद्यावर सतत असते. अशाप्रकारे वर्षेभर शेतात राबराब राबतात.परंतु बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर त्यांची आंघोळ करून त्यांच्या खांद्यावरील जखमांवर हळद लावून त्यांना दिलासा देतात.त्यालाच खांदशेकणी असे म्हणतात. खांदशेकनीच्या दिवशी प्रत्येक शेतकरी आपल्या बैलांना आमंत्रण (आवतन) देतांना म्हणतात "आज आवतन घ्या उद्या जेवायला या" ज्याप्रमाणे लग्नाकरीता नवरदेवाला सजविल्या जाते व अगोदरच्या दिवशी हळद लावल्या जाते त्याचप्रमाणे बैलाला हळद



लावून दुसऱ्या दिवशी सजवून बैलपोळयाच्या दिवशी बैलांची आंघोळ करून नीटनेटक्या पध्दतीने बैलांची सजावट करून ढोलताशेरे वाजवुन वाजत-गाजत, नाचत-कुदत बैलांना पोळयाच्या ठिकाणी एकत्र आणले जाते व प्रत्येक गावागावात किंवा शहरात महत्वाच्या ठिकाणी संपूर्ण बैल एकत्र होतात व संपूर्ण शेतकरी एकमेकांना आलिंगन घालून बैलपोळयाच्या शुभेच्छा देतात.या दिवशी बैल किंवा शेतमजूर यांच्या कामाला पुर्णतः सुट्टी असते.जो बैल वर्षभर शेतात राबतो आणि आपल्यासाठी कष्ट करतो त्याला फक्त बैलपोळयाच्या दिवशीच विश्रांती मिळते. यानंतर दुसऱ्याचं दिवशी तान्ह्या पोळा येतो या दिवशी बैलांचे महत्त्व लहान मुलांना समजावे या उद्देशाने लाकडाचे बैल सजवुन पोळयामध्ये नेण्यात येते व संपूर्ण बालगोपाल तान्ह्या पोळयांचा आनंद लुटतात व बैल घरोघरी घेऊन जातात आणि त्याची पुजाअर्चना केली जाते व बालगोपालांना पैसे किंवा भेट वस्तू देऊन त्यांचा आनंद व्दिगुणित केला जातो.अशा प्रकारे मोठ्या व्यक्तींपासुन तर बालगोपालांपर्यंत सर्वत्र बैलपोळयाचा व तान्ह्या पोळयाचा आनंद घेतांना दिसतात. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणांना आगळेवेगळे महत्व आपल्याला दिसून येते.त्यामुळे यात सर्वच मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.जो व्यक्ती किंवा शेतकरी बैलांना पोळयात घेऊन जातो त्याचाही मानसन्मान केला जातो.अशाप्रकारे शेतकऱ्यांसाठी वर्षभर राबणाऱ्या व प्रत्येक कामात सोबत तत्परतेने काम करणारा, धान्यासाठी वर्षभर कष्ट करणारा शेतकऱ्यांचा खरा सोबती,सखा जिवलग मित्र म्हणजे बैल.त्यामुळे बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा आहे.शेतकरी आपल्या पध्दतीने कष्ट करून शेती पिकवितात व संपूर्ण शेत हिरवागार गालिचाच्या रूपात आपल्याला दिसुन येते.त्यामुळे सर्वसामान्यांना, सामाजिक संस्थांना व सरकारला विनंती आहे की पोळयाचे औचित्य साधून वृक्षारोपण केले पाहिजे. कारण देशातील बदलते हवामान व वाढता अलनिनोचा प्रभाव आणि २६ ऑगस्ट २०२६ ला नेपाळमधील महाभयानक नैसर्गिक आपदांमुळे झालेली जिवीत हाणी लक्षात घेता वृक्षलागवड करून निसगार्ला वाचविने आपले प्रथम कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ यांचा नेहमीच सामना करावा लागतो आणि आता सध्याच्या परिस्थितीत देशातील अनेक भाग जलमग्न झाले आहे आणि अनेक शेतकऱ्यांची पीके पाण्याखाली आल्याने अत्यंत चिंतेत आहे व सध्याच्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळित झाले आहे यात वित्तीय हानी व मानवीय हानी सुध्दा झाली आहे किंवा होत आहे.अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांना निसगार्पासुन ताबडतोब दिलासा मिळावा हिच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.त्याच प्रमाणे देशात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भूकंप, ग्लेशियर वितळने, भुस्कखलन, ढगफुटी, ज्वालामुखीचा उद्रेक, नद्यांना महापुर इत्यादी भयावह घटना बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.यामुळे राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तीय हानी होत आहे. त्यावर फुंकर घालण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.यामुळे पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व गुरांना चारा मिळेल, सर्वांना शुध्द हवा मिळेल, ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मदत होईल व सृष्टी प्रफुल्लित राहील.बैल पोळयाच्या हार्दिक शुभेच्छा!

जय जवान जय किसान!

जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# दहीहंडीच्या निमित्ताने करमाळ्यात फुटली मोठी राजकीय हंडी

## काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव जगताप यांचा भाजपमध्ये प्रवेश

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त करमाळा येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य दहीहंडी उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माढा लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार तथा भाजपचे नेते रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उत्सव मोठ्या जल्लोषात पार पडला. मात्र, दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने झालेल्या एका महत्त्वपूर्ण राजकीय प्रवेशामुळे करमाळ्याच्या राजकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आले आहे. दहीहंडी फोडण्याबरोबरच काँग्रेसचे करमाळा तालुकाध्यक्ष प्रतापराव जगताप यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांच्यासोबत करमाळा तालुका काँग्रेस आयचे भटक्या विमुक्त जातीचे तालुकाध्यक्ष देवराव सुकळे, शिवसेनेचे युवक नेते संभाजी शिंदे, शहर युवकचे शहराध्यक्ष सुजय जगताप, योगेश राखुंडे यांच्यासह काँग्रेसचे सर्व उपाध्यक्ष सर्व पदाधिकारी तसेच पक्षाच्या विविध शाखेचे शाखाध्यक्ष इतर सर्व पदाधिकारी यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. त्यामुळे यंदाच्या दहीहंडी उत्सवात केवळ गोविंदा पथकांनीच हंडी फोडली नाही, तर करमाळ्यात मोठी ह्यराजकीय हंडीह्व देखील फुटल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. भाजपचे नूतन सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे यांनी जिल्हाध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर अवघ्या महिन्याभराच्या कालावधीत काँग्रेसच्या तालुकाध्यक्षांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून आणल्याने भाजपच्या संघटनात्मक बांधणीला मोठी चालना मिळाल्याचे बोलले जात आहे. आगामी काळात या



पक्षप्रवेशाचा करमाळा विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या संघटनात्मक ताकदीवर परिणाम होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. प्रतापराव जगताप हे माजी आमदार नामदेवराव जगताप यांचे चिरंजीव असून करमाळा तालुक्यात त्यांचे कार्यकर्त्यांचे व समर्थकांचे चांगले संघटन असल्याचे मानले जाते. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे काँग्रेसला धक्का बसला असून भाजपला मात्र स्थानिक पातळीवर एक मजबूत राजकीय चेहरा आणि संघटनात्मक बळ मिळाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पक्षप्रवेशानंतर बोलताना प्रतापराव जगताप यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचे विचार, विकासाची भूमिका आणि ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सांगितले. दरम्यान, दहीहंडीच्या निमित्ताने झालेला हा राजकीय प्रवेश आगामी काळातील करमाळ्याच्या राजकारणाची दिशा बदलणारा ठरणार का? याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे नेतृत्व, गणेश चिवटे यांची संघटनात्मक रणनीती आणि प्रतापराव जगताप यांचे स्थानिक संघटन यांचा मेळ भाजपला करमाळ्यात कितपत बळकटी देतो, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे. एकंदरीत, दहीहंडीच्या उत्सवात फुटलेली ही 'राजकीय हंडी' करमाळ्याच्या राजकारणात आगामी काळात कोणते नवे समीकरण घडवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी व्यासपीठावर माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख, करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी दादा जगताप, करमाळा नगरपालिकेचे माजी बांधकाम सभापती राहुल भैया जगताप, भाजपा मंडलाध्यक्ष काकासाहेब सरडे ,महाराष्ट्र चॅम्पियन अफसर जाधव, नगरसेवक रामभाऊ ढाणे, शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल, जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नव्याने भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केलेले पदाधिकारी व त्यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून करमाळा तालुक्यात पक्षाची संघटनात्मक ताकद आणखी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# शिक्षकांनी तन- मन लावून काम करणे गरजेचे- डांगे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शाळेची वैभवशाली परंपरा टिकवून ठेवायची असेल तर सर्व शिक्षकांनी तन-मन लावून काम केले पाहिजे. असे प्रतिपादन नगर जिल्ह्यातील कोकमठाण येथील मुख्याध्यापक निरंजन डांगे यांनी केले. छत्रपती शिवाजी प्रशालेतील राजश्री शाहू सभागृहात मराठा समाज सेवा मंडळ आणि यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचे औचित्य साधून देण्यात येणाऱ्या शिवतीर्थ व शारदा आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे हे होते. याप्रसंगी संस्थेचे सरचिटणीस प्रा महेश माने संचालक अशोक चव्हाण, शिवदास चटके, अलका सुरवसे, सुरेश पवार,राजेंद्र शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थाध्यक्ष सपाटे म्हणाले, शिक्षकांचा मान इतर पदांपेक्षा मोठा असून आजच्या बिघडलेला सामाजिक परिस्थितीला योग्य वळण लावण्याचे काम शिक्षकच करू शकतात. त्यामुळे त्यांनी तसा संकल्प केला पाहिजे. यावेळी आशा राठोड, प्रीती गावडे, सुनंदा पाटील , नंदा रंगदाळ, प्रा. वाल्मिकी कीर्तिकर, राजाराम शितोळे, संतोष अलकुंटे, उत्तरेश्वर लवटे, या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शिवतीर्थ व शारदा पुरस्काराने गौरवण्यात आला. या कार्यक्रमास तानाजी माने, नितीन मोटे, सुजाता जुगदार, मंजुश्री पाटील,मोहम्मद शेख,किशोर बनसोडे, उषा गोकळे, उदय पवार, अनिता कांबळे, श्रीराम बरगंडे, सुनिता निकम, दत्ता भोसले, भानुदास घन्दुरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक ज्ञानेश्वर सपाटे यांनी केले. तर सूत्रसंचालन सारिका पंडित यांनी केले. आभार विनायक पाटील यांनी मांडले.



### प्रा .गवळी यांच्याकडून सात लाखाची देणगी

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज चे शारीरिक शिक्षक संचालक प्रा संतोष गवळी यांनी आपल्या निवृत्ती निमित्त विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी संस्थेकडे सात लाख रुपयांचा धनादेश सुपूर्त केला. त्यानिमित्त त्यांच्या संस्थेच्या वतीने अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# करमाळ्यात 'ज्ञान माऊली' सांस्कृतिक उपक्रम उत्साहात

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येत असून, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने पुणे महसूल विभागातील सर्व जिल्ह्यांतील तालुक्यांमध्ये ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता एकाच वेळी 'ज्ञान माऊली' या सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. करमाळा येथील गुरु गणेश सभागृहात हा कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार, वारकरी संप्रदायाची शिकवण, अभंग, संगीत आणि संवादाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'ज्ञान माऊली' या उपक्रमाची संकल्पना राबविण्यात आली. आधुनिक काळातील तरुण पिढीला संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार आणि वारकरी संप्रदायाची मूल्ये सहज, सोप्या व प्रभावी पद्धतीने समजावून सांगण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपाचे जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना गणेश चिवटे यांनी सांगितले की, आजच्या पिढीसाठी वारकरी संप्रदायाचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. संतांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचविताना वारकरी संप्रदायाची परंपरा व चौकट कायम ठेवून ते साध्या, सरळ आणि संगीताच्या माध्यमातून तरुणांना रुचतील अशा पद्धतीने मांडण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येत असल्याबद्दल गणेश चिवटे यांनी सांस्कृतिक कार्य विभागाचे आणि मंत्री आशिष शेलार यांचे आभार मानले. संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक चौकटीत न ठेवता ते समाजजीवन, संस्कार आणि युवा पिढीच्या विचारविश्वाशी जोडण्याचे काम अशा सांस्कृतिक उपक्रमातून होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.



'ज्ञान माऊली' कार्यक्रमामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा संगीत, अभंग, संवाद व निरूपणाच्या माध्यमातून जागर करण्यात आला. त्यामुळे उपस्थित भाविक, वारकरी आणि नागरिकांना संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांची अनुभूती मिळाली. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या प्रसंगी वासकर संस्थेचे गुरुवर्य विठ्ठल महाराज पाटील, वारकरी तालुका संघाचे प्रदीप ढेरे, संतोष बनासे, लखन पवार तसेच ह.भ.प. विलास महाराज जाधव यांच्यासह वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते.

या सांस्कृतिक उपक्रमात सहभागी झालेल्या लहान मुलांपासून ते वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ व दिग्गज मान्यवरांपर्यंत सर्वांचा गणेश चिवटे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संत परंपरेशी जोडलेल्या नव्या पिढीतील बाल वारकऱ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. तसेच वारकरी संप्रदायाच्या प्रसारासाठी आणि संतविचारांच्या जागरासाठी कार्य करणाऱ्या ज्येष्ठांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष हा केवळ उत्सव न राहता त्यांच्या विचारांचा आणि समतेचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम ठरावे, या उद्देशाने 'ज्ञान माऊली' हा उपक्रम राबविण्यात आला. करमाळ्यातील कार्यक्रमामुळे गुरु गणेश सभागृहात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## वात्रटिका

### बैल पोळा

तो हुलकावणी देऊन गेला
आता वर बघा नि हात चोळा...
पिकं करपली,मालक चिंतेत
कसा साजरा करू बैल पोळा...
याचं दुःख तो जाणतो आणि
त्याच्या वेदना याला कळतात...
रानांत पिकं नि सर्जाला राजाला
बघून घरा घरात मनं जळतात...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# पंढरपूर नगरपालिकेच्या सभेत गदारोळ

## भाजपचा सभात्याग, आघाडीकडून निषेधाच्या घोषणा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपालिकेच्या आज झालेल्या सर्वसाधारण सभेत मोठा गदारोळ झाला. स्थायी समितीची बैठक का बोलावली जात नाही आणि नगरपालिकेची जागा विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला देऊ नये, या मुद्द्यांवरून भाजप आणि तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरसेवक आमने-सामने आले.

या मुद्द्यावरून नगरसेवक ओंकार जोशी, भागवत बडवे, राहुल शिंदे-नाईक, संजय बंदपट्टे, उपनगराध्यक्ष





महादेव धोत्रे आणि लक्ष्मण पापरकर यांच्यामध्ये जोरदार खडाजंगी झाली. संतापलेल्या भाजपच्या नगरसेवकांनी सभात्याग केला. भाजपच्या सदस्यांनी सभा सोडताच तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगरसेवकांनी त्यांच्या या कृतीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करत निषेधाच्या घोषणा दिल्या, त्यामुळे सभागृहातील वातावरण आणखीनच तापले.

यावेळी नगरसेवक सुनील वाळूजकर यांनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला जागा देण्याच्या विषयावर केवळ वाद न घालता, पालिकेची विशेष सर्वसाधारण सभा बोलावून सविस्तर चर्चा करावी, अशी मागणी केली. त्यावर नगराध्यक्षा प्रणिता भालके यांनी सर्व सदस्यांशी चर्चा करून याबाबत योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर वातावरण शांत झाले आणि सभेचे कामकाज पुन्हा सुरू झाले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सीना-माढा योजनेच्या नूतनीकरणाला हिरवा कंदील
## आ. अभिजीत पाटील यांचे पाठपुराव्याला यश



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती व नूतनीकरणाचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. योजनेतील तब्बल २१ वर्षे जुनी यंत्रणा बदलण्यासह सर्व मोटारी बदलण्यात येणार असून सुमारे ६ किलोमीटर लांबीची मेन रायझिंग पाइपलाइनही नव्याने टाकण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून अपुऱ्या व अनियमित पाण्यामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याने माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांचे सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

आज मुंबई येथे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नियामक मंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीस माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील उपस्थित होते. या बैठकीत सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती व नूतनीकरणाबाबत सविस्तर चर्चा होऊन जुन्या यंत्रणेच्या पुनर्बांधणीस मंजुरी देण्यात आली.

सीना-माढा उपसा सिंचन योजना गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी ठरत आली आहे. मात्र, योजनेतील यंत्रणा जुनी झाल्याने मोटारी, पंपिंग व्यवस्था आणि पाइपलाइनच्या क्षमतेवर परिणाम होत होता. परिणामी अपेक्षित क्षमतेने पाणी उपसा करून ते शेतीपर्यंत पोहोचवताना अडचणी निर्माण होत होत्या.

या पार्श्वभूमीवर सर्व मोटारी बदलणे, पंपिंग यंत्रणा सक्षम करणे आणि सुमारे ६ किलोमीटरची मेन रायझिंग पाइपलाइन नव्याने उभारणे, असा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या यंत्रणेचे नूतनीकरण झाल्यानंतर योजनेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांना अधिक प्रभावीपणे पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सीना-माढा सिंचन योजनेच्या प्रश्नासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी गेल्या काही काळापासून सातत्याने पाठपुरावा केला होता. योजनेची सद्यस्थिती, जुन्या मोटारी व पाइपलाइनमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले होते.

शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात मिळण्यासाठी योजनेची यंत्रणा सक्षम होणे अत्यावश्यक असल्याची भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत नियामक मंडळाने दुरुस्ती व नूतनीकरणाच्या कामाला मंजुरी दिली आहे. सीना-माढा योजनेतील मोटारी व मुख्य पाइपलाइन बदलण्याच्या निर्णयामुळे माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. योजनेची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्यास अनेक गावांतील शेतीला त्याचा थेट फायदा होऊ शकतो. त्यामुळे मंजुरीनंतर आता प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळणार आणि सुधारित यंत्रणेतून शेतकऱ्यांना नियमित पाणी कधी मिळणार, याकडे शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे.

सीना-माढा योजनेतील मोटारी व मुख्य पाइपलाइन बदलण्याच्या निर्णयामुळे माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. योजनेची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्यास अनेक गावांतील शेतीला त्याचा थेट फायदा होऊ शकतो. त्यामुळे मंजुरीनंतर आता प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळणार आणि सुधारित यंत्रणेतून शेतकऱ्यांना नियमित पाणी कधी मिळणार, याकडे शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे. या निर्णयासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, हेमंतजी धुमाळ, चोपडे, एस.सी. खांडेकर तसेच या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करणारे अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

> पाणी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात मिळाले की शेती फुलते आणि शेती फुलली की माढ्याचा विकास अधिक वेगाने होईल त्यामुळे सीना-माढा योजनेच्या दुरुस्ती व नूतनीकरणाचा हा निर्णय केवळ यंत्रणा बदलण्यापुरता मर्यादित नसून माढ्यातील शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. माढ्याच्या मातीतील प्रत्येक शेतकरी सुखी आणि समृद्ध व्हावा, हीच आपली मनापासूनची इच्छा असून शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठीचा लढा यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व सर्व अधिकाऱ्यांचे आभार.
>
> **– आ. अभिजीत आबा पाटील,** माढा विधानसभा मतदारसंघ

# पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक- दिलीप पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिवसभर बातम्यांच्या शोधात धावपळ करणाऱ्या पत्रकारांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. उत्तम आरोग्य असेल तरच अधिक जोमाने आणि प्रभावीपणे कर्तव्य बजावता येते, असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप पवार यांनी केले.

जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त होली स्पिरिट फिजिओथेरपी सेंटर आणि श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला पत्रकार, छायाचित्रकार, कॅमेरामन आणि त्यांच्या कुटुंबीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप पवार, जेसीएफए मिनिस्ट्री सोलापूरचे संस्थापक डॉ. डॅनियलपॉल यंगल, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, दैनिक 'पुढारी'चे संपादक संजय पाठक, होली स्पिरिट फिजिओथेरपी सेंटरचे डॉ. राजेश सांगे आणि डॉ. प्रकाश सांगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पवार म्हणाले, पत्रकार हे समाजातील महत्त्वाचा घटक असून ते दिवसभर विविध घटनांचे वार्तांकन करण्यासाठी धावपळ करीत असतात. या व्यस्त दिनचर्येत अनेकदा त्यांच्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे पत्रकारांनी नियमित आरोग्य तपासणी करून आरोग्याबाबत सजग राहणे आवश्यक आहे. पत्रकारांच्या आरोग्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेले हे शिबिर निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. डॅनियलपॉल यंगल यांनी होली स्पिरिट फिजिओथेरपी सेंटरच्या उपक्रमाचे कौतुक केले. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. पत्रकारांसाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात डॉ. राजेश सांगे यांनी शिबिरामागील उद्देश स्पष्ट केला. होली स्पिरिट फिजिओथेरपी सेंटरच्या वतीने समाजातील विविध घटकांसाठी आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. प्रकाश सांगे यांनी आभार मानले. यावेळी पत्रकार, छायाचित्रकार आणि कॅमेरामन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नातेपुतेत 'डीजे-डॉल्बी मुक्त गणेशोत्सवा'चा निर्धार!
## गणेशोत्सव मंडळांना पोलिस प्रशासनाच्या सूचना



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** आगामी श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून उत्सव शांततामय, शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी नातेपुते नगरपंचायत व महावितरणच्या समन्वयाने गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील व प्रतिष्ठित नागरिकांची बैठक घेण्यात आली.

यावेळी 'डीजे व डॉल्बी मुक्त गणेशोत्सव' साजरा करण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले असून या घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांनी मार्गदर्शनपर बोलत असताना सांगितले की, ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता गणेश मंडळांनी ध्वनिक्षेपकाचा मर्यादित व नियमबद्ध वापर करावा,

गणेशोत्सव मंडळांनी कोणत्याही समाजाच्या भावना दुखावतील अथवा सामाजिक तेढ निर्माण होईल, असे आक्षेपार्ह देखावे, होर्डिंग, बॅनर किंवा इतर साहित्य लावू नये, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच गणेश मंडपामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.मंडळाच्या ठिकाणी २४ तास स्वयंसेवकांची नियुक्ती करावी, गर्दीच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सतर्क राहावे, जातीय वाद, सामाजिक तेढ अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा प्रकारचे कोणतेही कृत्य खपवून घेतले जाणार नाही. शासन व प्रशासनाने निर्गमित केलेल्या सर्व नियमांचे आणि सूचनांचे काटेकोरपणे पालन करून गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांनी केले.

दरम्यान, तरुणांनी व्यसनांच्या आहारी न जाता जिम, व्यायाम आणि क्रीडा क्षेत्राकडे वळावे, तसेच निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबतच शालेय व मैदानी खेळांमध्ये सहभागी होऊन शारीरिक व मानसिक आरोग्य मजबूत करावे,गणेशोत्सव हा भक्तीबरोबरच सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकोप्याचा संदेश देणारा उत्सव आहे. त्यामुळे सर्व गणेश मंडळांनी सामाजिक बांधिलकी जपत नियमांचे पालन करून उत्सवाचा आदर्श निर्माण करावा, असे आवाहन सपोनी विशाल वायकर यांनी बैठकीत केले.

बैठकीस नातेपुते पोलीस ठाण्याचे सपोनी विशाल वायकर नातेपुते नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अतुल पाटील, नगरसेवक अविनाश दोशी, सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड, नातेपुते विद्युत महामंडळाचे अभियंता निकम तसेच गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, प्रतिष्ठित नागरिक तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## राजमुद्रा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मोडनिंब
### विषय- वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २५ सप्टेंबर २०२६
### सभेचा अजेंठा

राजमुद्रा अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर या संस्थेची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक १२ वाजता संस्थेचे मुख्य कार्यालय शंभूराजे बिल्डिंग जिजाऊ नगर मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर येथे खालील विषयास मंजुरी घेण्याकरिता आयोजित करण्यात येत आहे.

**सभेचे विषय**

१) सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.
२) मागील झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
३) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल ताळेबंद पत्रक नफा तोटा पत्रक वाचून मान्यता घेणे.
४) स्वनिधी विनियोगावर चर्चा करणे.
५) सन २०२५-२०२६ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे.
६) सन २०२५-२०२६ च्या दोषदुरुस्ती अहवालाचे वाचन करणे व त्यास मान्यता घेणे.
७) सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमीजास्त व सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
८) बाहेरील कर्जाची मर्यादा ठरवणे.
९) सन २०२६-२०२७ करिता वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
१०) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

ठिकाण :- मोडनिंब
दिनांक :- १०/०९/२०२६

**सही/- सचिव**
**राजमुद्रा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मोडनिंब.**

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
**विभागीय कार्यालय क्र. २, मंगळवार बाजार, सोलापूर**
e-mail : smczone333@gmail.com

जा.क्र/वि.का.क्र.२/५०५ दिनांक :- ०९/०९/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**

प्रभाग क्र. १ येथे महर्षी गौतम नगर परिसरात फरशीकरण करणे.
सो.म.पा. संकेतस्थळ अनुः क्रमांक - ६६४७
वर नमुद कामाचे टेंडर सोमनपाच्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर पासून दि.०९/०९/२०२६ ते दि.१६/०९/२०२६ पर्यंत दुपारी १ वाजेपर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**विभागीय अधिकारी**
**विभागीय कार्यालय क्र. ०२**

# करमाळ्यात 'ज्ञान माऊली' सांस्कृतिक उपक्रम उत्साहात



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येत असून, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने पुणे महसूल विभागातील सर्व जिल्ह्यांतील तालुक्यांमध्ये ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता एकाच वेळी 'ज्ञान माऊली' या सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. करमाळा येथील गुरु गणेश सभागृहात हा कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार, वारकरी संप्रदायाची शिकवण, अभंग, संगीत आणि संवादाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'ज्ञान माऊली' या उपक्रमाची संकल्पना राबविण्यात आली. आधुनिक काळातील तरुण पिढीला संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार आणि वारकरी संप्रदायाची मूल्ये सहज, सोप्या व प्रभावी पद्धतीने समजावून सांगण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपाचे जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना गणेश चिवटे यांनी सांगितले की, आजच्या पिढीसाठी वारकरी संप्रदायाचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. संतांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचविताना वारकरी संप्रदायाची परंपरा व चौकट कायम ठेवून ते साध्या, सरळ आणि संगीताच्या माध्यमातून तरुणांना रुचतील अशा पद्धतीने मांडण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येत असल्याबद्दल गणेश चिवटे यांनी सांस्कृतिक कार्य विभागाचे आणि मंत्री आशिष शेलार यांचे आभार मानले. संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक चौकटीत न ठेवता ते समाजजीवन, संस्कार आणि युवा पिढीच्या विचारविश्वाशी जोडण्याचे काम अशा सांस्कृतिक उपक्रमातून होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

'ज्ञान माऊली' कार्यक्रमामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा संगीत, अभंग, संवाद व निरूपणाच्या माध्यमातून जागर करण्यात आला. त्यामुळे उपस्थित भाविक, वारकरी आणि नागरिकांना संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांची अनुभूती मिळाली. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या प्रसंगी वासकर संस्थेचे गुरुवर्य विठ्ठल महाराज पाटील, वारकरी तालुका संघाचे प्रदीप ढेरे, संतोष बनासे, लखन पवार तसेच ह.भ.प. विलास महाराज जाधव यांच्यासह वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते.

या सांस्कृतिक उपक्रमात सहभागी झालेल्या लहान मुलांपासून ते वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ व दिग्गज मान्यवरांपर्यंत सर्वांचा गणेश चिवटे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संत परंपरेशी जोडलेल्या नव्या पिढीतील बाल वारकऱ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. तसेच वारकरी संप्रदायाच्या प्रसारासाठी आणि संतविचारांच्या जागरासाठी कार्य करणाऱ्या ज्येष्ठांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष हा केवळ उत्सव न राहता त्यांच्या विचारांचा आणि समतेचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम ठरावे, या उद्देशाने 'ज्ञान माऊली' हा उपक्रम राबविण्यात आला. करमाळ्यातील कार्यक्रमामुळे गुरु गणेश सभागृहात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क -
शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस
रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
## अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत
चिंचोळी MIDC,
सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ -
11:30 ते 2 वा.


## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार- *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा
३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ
५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत)
१६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 52

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 4 | | | | | 5 | 1 |
| | | 7 | | | 3 | | 6 | 9 |
| | 6 | | 5 | | 4 | | | |
| | 3 | 8 | 4 | 5 | 1 | | | |
| 2 | | | | | 6 | 8 | | 5 |
| 6 | | | | | 2 | 7 | | |
| 3 | 8 | | 1 | 7 | 5 | | | |
| 4 | | | 3 | 6 | 9 | 1 | | 8 |
| | 1 | | | | | 5 | 7 | |

# ‘आरक्षण आमच्या हक्काचे’चा हुंकार

## जरांगे यांच्या समर्थनार्थ मोडनिंब बंद




**मोडनिंब (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सोमवारी मोडनिंब (ता. माढा) येथे सकल मराठा समाज व ग्रामस्थांच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला.

सकाळी ८ वाजल्यापासून गावातील दुकाने, किराणा दुकाने, हॉटेल्स, बाजारपेठेसह विविध व्यावसायिक आस्थापने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवण्यात आली. सकल मराठा समाजासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने दत्त चौकात एकत्र आले. यावेळी तरुणांनी ‘एक मराठा, लाख मराठा’, ‘आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे’ आणि ‘मनोज जरांगे, तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं’ अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

मराठा समाजाला तातडीने कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवगार्तून आरक्षणाचा लाभ मिळावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. मराठा आरक्षणाची मागणी मान्य होईपर्यंत मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला मोडनिंबचा पूर्ण पाठिंबा राहील, असा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच जरांगे यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी ग्रामस्थांनी प्रार्थना केली.

मोडनिंबमधील बंद शांततेत आणि उत्स्फूर्तपणे पार पडला. टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ग्रीन बिल्डिंग करा, महापालिका करात सूट देणार!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरणपूरक बांधकामांना प्रोत्साहन देण्यासाठी सोलापूर महापालिकेने ‘ग्रीन बिल्डिंग’ संकल्पनेला करसवलतीचे प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. सात प्रमुख पर्यावरणपूरक निकष पूर्ण करणाऱ्या मालमत्ताधारकांना मालमत्ता करात सवलत देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मांडण्यात आला आहे. स्थायी समितीच्या मंजुरीनंतर मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत या प्रस्तावावर चर्चा होऊन अंतिम निर्णय होणार आहे.

वाढते शहरीकरण, ऊर्जा वापर, पाणीटंचाई, वायुप्रदूषण आणि वाढते तापमान या समस्यांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणस्नेही बांधकामांना चालना देण्याच्या उद्देशाने ही योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. ह्यग्रीन बिल्डिंग'साठी आवश्यक प्रमाणपत्राच्या श्रेणीनुसार करसवलत देण्यात येणार आहे.



प्लॅटिनियम प्रमाणपत्रधारकांना १० टक्के, गोल्ड प्रमाणपत्रधारकांना ७.५ टक्के, तर सिल्वर प्रमाणपत्रधारकांना ५ टक्के मालमत्ता करात सवलत मिळणार आहे.

‘ग्रीन बिल्डिंग'साठी सौरऊर्जा, नैसर्गिक वायुवीजन, एलईडी दिव्यांचा वापर, रेन वॉटर हार्वेस्टिंग व पाण्याचा पुनर्वापर, टिकाऊ व कमी प्रदूषण करणाऱ्या बांधकाम साहित्याचा वापर, कचरा व्यवस्थापन व पुनर्वापर, नैसर्गिक प्रकाश व हवेशीर रचना, गच्चीवरील बाग किंवा व्हर्टिकल गार्डन, वृक्षारोपण तसेच ई-व्हेईकल चार्जिंगसारख्या बाबींना प्राधान्य देण्यात आले आहे.

दरम्यान, सर्वसाधारण सभेसमोर अग्निशामक विभागासाठी बाह्यस्त्रोतामार्फत ११ महिन्यांसाठी ४० कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. महापालिकेच्या आकृतीबंधानुसार अग्निशामक विभागातील मंजूर पदांची संख्या ९० असून सध्या केवळ ५२ कर्मचारी कार्यरत आहेत. शहराचे क्षेत्रफळ आणि वाढती गरज लक्षात घेता मनुष्यबळ अपुरे असल्याने अतिरिक्त कर्मचारी नियुक्तीचा प्रस्ताव करण्यात आला आहे.

याशिवाय शहरातील वृक्षांचे संरक्षण व संवर्धन, वृक्षतोडीवर नियंत्रण, वृक्षलागवड तसेच धोकादायक वृक्षांबाबत प्राप्त तक्रारींचे निवारण करण्यासाठी ह्यवृक्ष प्राधिकरण’ स्थापन करण्याचा प्रस्तावही सभेसमोर ठेवण्यात आला आहे. यासोबतच विविध नामकरणाचे प्रस्तावही सभासदांनी मांडले आहेत.

# मराठा आरक्षणासाठी विद्यार्थ्यांचा तहसील कार्यालयावर मोर्चा



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाला मिळालेले आरक्षण टिकवून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवगार्तून आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मंगळवेढा शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला.

या मोर्चामध्ये शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तहसील कार्यालय परिसरात विद्यार्थ्यांनी ठिय्या आंदोलन करत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली. यानंतर प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व भवितव्याचा विचार करून शासनाने मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात आणि मनोज जरांगे यांचे आमरण उपोषण सोडवावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

मंगळवेढा शहर व तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला. मराठा समाजाच्या विविध संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही मोर्चात सहभाग नोंदवला.

मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्टपासून जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाला राज्यभरातून विविध स्तरांतून पाठिंबा व्यक्त होत आहे.

# खा. प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दिशा समितीची बैठक संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची (दिशा) बैठक खासदार प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी त्यांनी सर्व संबंधित यंत्रणांना मार्गदर्शक सूचना दिल्या.

नियोजन भवन येथील समिती सभागृहात झालेल्या बैठकीत केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, खासदार ज्योती वाघमारे, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) संतोषकुमार देशमुख यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### रोजगारनिर्मितीला प्राधान्य द्यावे

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कामे सेल्फवर ठेवून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून द्यावा. मंजूर असलेली पाणंद रस्त्यांची कामे तातडीने सुरू करावीत तसेच अद्याप सुरू न झालेली कामेही विलंब न करता मार्गी लावावीत.

धोकादायक अंगणवाडी इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यकतेनुसार नवीन जागेचे प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत. स्वच्छ भारत मिशन, शहराचा पाणीपुरवठा, नवीन अंगणवाड्यांचे प्रस्ताव, अंगणवाड्यांमध्ये शुद्ध पाणी व स्वच्छतागृहांची सुविधा, बालकांची नियमित आरोग्य




तपासणी तसेच त्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

### योजनांची अंमलबजावणी वेळेत करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

बैठकीत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी विविध केंद्रीय योजनांच्या सद्यस्थितीचा आढावा घेत संबंधित विभागांना योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे आणि निर्धारित कालावधीत करण्याच्या सूचना दिल्या. योजनांमधील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर भर द्यावा. केंद्र शासनाच्या योजनांच्या लाभापासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही या दृष्टीने सर्व विभाग प्रमुखांनी प्रयत्न करावेत असेही त्यांनी निर्देशित केले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्तीची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने होणार असून, पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानही मिळणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि आमदार अभिजीत पाटील यांनी रोजगार हमी योजना, महिला बचत गट, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, सोलापूर शहर भुयारी गटार योजना, पायाभूत सुविधा, आरोग्य योजना तसेच विविध योजनांअंतर्गत प्रलंबित असलेली कामे तसेच कामांमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत माहिती जाणून घेऊन प्रशासनाने हे सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत अशी मागणी केली.

प्रारंभी केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या विविध शासकीय विभागांनी त्यांच्या विभागांतर्गत सुरू असलेल्या योजनांची माहिती आणि सद्यस्थिती बैठकीत सादर केली. मागील दिशा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून त्यास सवार्नुमते मंजुरी देण्यात आली.

बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रम, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, अमृत अभियान, सोलापूर शहर पाणीपुरवठा व भूयारी गटार योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व शहरी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, समग्र शिक्षा, एकात्मिक बाल विकास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, डिजिटल इंडिया, सांसद आदर्श ग्राम योजना यांसह विविध केंद्रीय योजनांचा आढावा घेण्यात आला.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप यांनी बैठकीच्या विषयांची माहिती दिली.

# माळी महासंघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी शंकर वाघमारे





**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** माळी महासंघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे, तर महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ. निशिगंधा माळी यांची निवड करण्यात आली आहे.

नागपूर येथील माळी महासंघाच्या कार्यालयातून राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारिणीत सोलापूर जिल्ह्यातील माळी समाजातील विविध क्षेत्रांत कार्यरत मान्यवरांना राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय निवड समितीचे प्रमुख रवींद्र अवाडकर यांनी शंकर वाघमारे यांच्या निवडीची घोषणा केली. भारत माळी यांच्यावर राष्ट्रीय सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच माळीनगर साखर कारखान्याचे चेअरमन रंजन गिरमे आणि सांगोल्याचे माजी नगराध्यक्ष डॉ. प्रभाकर माळी यांची महासंघाच्या सल्लागारपदी निवड करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील या मान्यवरांची राष्ट्रीय कार्यकारिणीत निवड झाल्याने माळी समाजाच्या विविध क्षेत्रांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि सामाजिक कायार्चा उपयोग महासंघाच्या संघटनात्मक विस्तारासाठी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# साहित्य सेवा संघाचा ‘उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार’ डॉ. शंकर नवले यांना प्रदान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** साहित्य सेवा संघ, सोलापूर यांच्या वतीने देण्यात येणारा ‘उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार’ सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगावचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांना प्रदान करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कर्नल प्रकाश महानवर यांच्या हस्ते रविवारी (ता. ६) महाविद्यालयात झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात डॉ. नवले यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. शंकर नवले यांनी हा पुरस्कार सहकुटुंब स्वीकारला.

‘माऊलीची कुशी’ या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व मनोरमा परिवाराचे सर्वेसर्वा श्रीकांत मोरे होते. ज्येष्ठ कवी व लेखक प्रदीप पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. साहित्य सेवा संघाचे अध्यक्ष दत्तात्रय इंगळे (आलूरकर), सोलापूर विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी डॉ. शंकर नवले यांनी केलेले प्रयत्न, महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेले विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या बदलत्या गरजांनुसार सक्षम करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.

प्राचार्य म्हणून कार्यरत असताना डॉ. नवले यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यातील तांत्रिक कौशल्ये, नवोपक्रमाची वृत्ती, संशोधनाची आवड आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्यावर भर दिला. उद्योगक्षेत्रातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञान, कौशल्याधारित शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमांना चालना देण्यात आली.

प्राचार्य डॉ. शंकर नवले यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

# नेहरू वसतिगृहातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा द्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या नेहरू वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अस्वच्छता, निकृष्ट सुविधा आणि विविध मूलभूत समस्यांबाबत तातडीने उपाययोजना करून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबतचे निवेदन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांना देण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे उपस्थित होते. निवेदनाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून वसतिगृहातील आवश्यक कामे तातडीने सुरू करण्याचे आदेश देण्यात आले.

ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आधार मिळावा, या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या माध्यमातून नेहरू



वसतिगृह चालविले जाते. मात्र, सध्या वसतिगृहात मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून नियमित स्वच्छता होत नसल्याच्या तक्रारी आहेत. स्वच्छतागृहे व बाथरूम अस्वच्छ असून तुंबलेली शौचालये, दुर्गंधी, सांडपाणी आणि घाणीमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

वसतिगृहातील दरवाजे, खिडक्या, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था यांसह अन्य भौतिक सुविधांचीही दुरवस्था झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. स्वच्छतेसाठी ठेकेदाराची नियुक्ती असतानाही नियमित व प्रभावी स्वच्छता होत नसेल, तर संबंधित कामाची चौकशी करून हलगर्जीपणा आढळल्यास कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वसतिगृहाची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा अहवाल घ्यावा, सर्व शौचालये व बाथरूमची तातडीने स्वच्छता करावी, परिसरातील कचरा हटवून दररोज स्वच्छतेची व्यवस्था करावी, विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच नियमित आरोग्य तपासणी व स्वच्छता निरीक्षणाची व्यवस्था करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

तसेच वसतिगृहाच्या देखभाल व स्वच्छतेसाठी मंजूर होणाऱ्या निधीचा योग्य वापर होतो की नाही, याची प्रशासकीय चौकशी करावी आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र तक्रार नोंदवही अथवा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, दक्षिण तालुका अध्यक्ष जैनुद्दीन नदाफ, जिल्हा कार्याध्यक्ष मनीषा कोळी, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे, कृष्णा पवार, सचिन मोरे, युवराज माने आदी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री संत सेना महाराज नाभिक समाज बहुउद्देशीय संस्था, अक्कलकोट शहर व तालुका यांच्या वतीने श्री संत सेना महाराजांची पुण्यतिथी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

अक्कलकोट शहराध्यक्ष लक्ष्मण विभुते यांच्या पत्नी अहिल्याताई विभुते यांच्या हस्ते श्री संत सेना महाराजांच्या मूतीर्ला अभिषेक करण्यात आला. सायंकाळी पाच वाजता गोरज मुहूर्तावर नाभिक समाजातील नवदांपत्य राहुल भाले व समर्थ विभुते यांच्या हस्ते श्री संत सेना महाराजांची स्थापना करण्यात आली. यावेळी अक्कलकोट भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला.

यावेळी आयोजित भव्य रक्तदान शिबिराचे उद्घाटन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराज भोसले व उपाध्यक्ष अभय खोबरे उपस्थित होते.

दुपारी १२ वाजून ५ मिनिटांनी मान्यवरांच्या उपस्थितीत गुलालाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी नगरसेवक यशवंत धोंगडे, उपनगराध्यक्ष ऋतुराज ह्यबंटीह्ण राठोड, श्री स्वामी समर्थ मंदिराचे अध्यक्ष महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश इंगळे, आरोग्य सभापती अविनाश मडिखांबे, नागराज कुंभार, नन्नू कोरबू, इरफान कोरबू, नगरसेवक देविदास कवटगी, योगेश पवार, उद्योगपती निळकंठ हिंडोळे, समर्थ नगर ग्रामपंचायतीचे सरपंच प्रदीप पाटील यांच्यासह विविध मान्यवर सहभागी झाले.

कार्यक्रमात जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, अमोलराजे जनमेजयराजे भोसले, यशवंत तात्या धोंगडे, उपनगराध्यक्ष बंटी राठोड यांच्यासह नगरसेवक अविनाश मडिखांबे, नन्नू कोरबू, देविदास कवटगी, योगेश पवार, प्रदीप पाटील, इरफान कोरबू, निळकंठ हिंडोळे, रमेश सोडगी आदी मान्यवरांचा नाभिक समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी नाभिक समाज बहुउद्देशीय संस्थेचे चेअरमन सुदर्शन विभुते, शहराध्यक्ष लक्ष्मण विभुते, उपाध्यक्ष राजेश कोरे, प्रविण राऊत, प्रभाकर सुरवसे, महेश घाटे, मार्गदर्शक पंच पद्माकर डिगे, श्रीकांत विभुते, सोमनाथ सुरवसे, भागवत विभुते, राजेंद्र सुरवसे, अमोल सुरवसे, तेजस विभुते, तालुकाध्यक्ष शिवशरण सुरवसे, युवक तालुकाध्यक्ष श्रीशैल सुरवसे, महिला तालुकाध्यक्षा श्रीमती सुरवसेताई, युवक अध्यक्षा भाग्यश्रीताई काळे, संस्थापक अध्यक्ष नरसिंग क्षीरसागर यांच्यासह समाजातील पदाधिकारी, नागरिक, माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष सुरवसे सर यांनी केले, तर आभार तालुकाध्यक्ष शिवशरण सुरवसे यांनी मानले. धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वच्छ भारत अभियानांतर्गत सोलापूर शहरात चार ठिकाणी शौचालयांची उभारणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व सुविधायुक्त सार्वजनिक शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर शहरात एकूण चार ठिकाणी आकांक्षी शौचालयांची उभारणी करण्यात आली आहे. यापैकी नाना-नानी पार्क, सात रस्ता येथे उभारण्यात आलेल्या आकांक्षी शौचालयाचा लोकार्पण सोहळा महापौर विनायक कोंड्याल यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला.

शहरातील नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात, तसेच सार्वजनिक स्वच्छतेला चालना मिळावी, या उद्देशाने महानगरपालिकेच्या माध्यमातून हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे.

### या चार ठिकाणी आकांक्षी शौचालयांची उभारणी



सोलापूर शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांची गरज लक्षात घेऊन खालील चार ठिकाणी आकांक्षी शौचालये उभारण्यात आली आहेत :

नाना-नानी पार्क, सात रस्ता

एच.एस.आर. पाणी टाकी शेजारी, जुळे सोलापूर

विणकर बाग, कन्ना चौक,

एस.टी. स्टँडसमोर, क्रोमा शोरूमच्या शेजारी

या शौचालयांमुळे शहरातील प्रमुख वर्दळीच्या ठिकाणी नागरिकांना सार्वजनिक स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध होणार असून, विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शहरात विविध कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे.

### स्वच्छतेसोबत नागरिकांच्या आरोग्याचीही काळजी

यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले की, शहराचा विकास केवळ रस्ते, पाणी व इतर पायाभूत सुविधांपुरता मर्यादित न राहता नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधाही सक्षम असणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ व चांगल्या दर्जाची शौचालये उपलब्ध करून देणे हा स्वच्छ आणि निरोगी शहराच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा आहे.

‘स्वच्छ सोलापूर, सुंदर सोलापूर’ या संकल्पनेच्या दिशेने महानगरपालिका सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, नागरिकांनीही सार्वजनिक स्वच्छता राखण्यासाठी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापौरांनी यावेळी केले.

या उपक्रमामुळे शहरातील चार महत्त्वाच्या ठिकाणी नागरिकांना सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध झाली असून, स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या स्वच्छता अभियानाला आणखी बळकटी मिळाली आहे.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरीताई देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिताताई चाकोते, शहराध्यक्ष रोहिणीताई तडवळकर आयुक्त डॉ. सचिन ओंबासे महिला व बालकल्याण सभापती निर्मला जंगम गटनेते वायदाबानो शेख मंडळ उद्यान सभापती राज्यकर पाटील नगरसेविका श्वेता खरात खांडेकर नगरसेविका कल्पना कदम अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे आदी मन्यावर उपस्थित होते.